# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. शाकेरा इनामदार
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
कार्यक्रम समन्वयक

दूरध्वनी (कार्यालय): ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
टेलीफॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८२२ ७० ७० ६१


संदर्भ : रासेयो/७८३ /१३

दि : १७ जुलै २०१३

प्रति
मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी
रासेयो संलग्नित महाविद्यालये
पुणे शहर

'अमृत –वर्षा महोत्सव' २०१३

**विषय:** भात लागवडीसाठी तरूणांचे अभियान...

महोदय,

सन २०१२ च्या पावसाळयामध्ये वनराईच्या वतीने प्रसिद्ध कायदेपंडीत ॲड. नंदू फडके यांच्या नेतृत्वाखाली वेल्हे तालुक्यातील विंझर गावामध्ये 'अमृतवर्षा' महोत्सव राबविण्यात आला. **'एक दिवस शेतासाठी, शेतकऱ्यांच्या मदतीसाठी'** हे या कार्यक्रमाचे घोषवाक्य होते. या कार्यक्रमांतर्गत पुणे शहराच्या विविध महाविद्यालयातील सुमारे २२०० विद्यार्थ्यांनी विंझर गावातील सुमारे २२० एकर क्षेत्रात भात लावणी केली. यामुळे विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्व पटले आणि अन्नधान्य निर्मितीमध्ये शेतकऱ्यांचे किती कष्ट असतात याची जाणीव विद्यार्थ्यांना झाली. अनेक विद्यार्थ्यांनी येथून पुढे आम्ही अन्न वाया घालविणार नाही अशी शपथ घेतली. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही २०% भर पडली. यावर्षी हा 'अमृतवर्षा' महोत्सव दिनांक १३ जुलै २०१३ ते २३ जुलै २०१३ दरम्यान होणार असून यामध्ये पुणे शहरातून ५५,००० युवक सामील होवून ५५०० एकर क्षेत्रावर यावर्षी भातलावणी करणार आहेत.

तरी या उपक्रमामध्ये रासेयोच्या वतीने विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व पटावे म्हणून आपल्या महाविद्यालयातील इच्छूक रा.से.यो. स्वयंसेवक यांना वरील कालावधीमध्ये शिबिरात सहभागी होण्यासाठी पाठवावे ही विनंती. सदर उपक्रमासाठी स्वयंसेवकांकरीता पुणे शहरातून ११० बसेसची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

अधिक माहितीसाठी : ॲड. नंदू फडके, वनराई, पर्वती, पुणे – मो. ९४२२०८८९९३

कळावे,

आपली विश्वासू

कार्यक्रम समन्वयक,
राष्ट्रीय सेवा योजना